कंत्राटी तत्वावरील कर्मचाऱ्यांना अनुज्ञेय प्रवास
भत्ता व दैनिक भत्ता प्रदान करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
नियोजन (रोहयो) विभाग,
शासन निर्णय क्रमांक- कंत्राटी-२०१२/प्र.क्र. २७/मग्रारो-३
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक: २१ ऑगस्ट, २०१२.

**वाचा:** नियोजन (रोहयो) विभाग, शासन परिपत्रक क्र. मग्रारोहयो-२०१०/प्र.क्र. ७/रोहयो-१०अ,
दि. १६ डिसेंबर, २०१०.

**प्रस्तावना:-** राज्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेची अंमलबजावणी अधिक प्रभावीरितीने करण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, तहसिल पंचायत समिती व ग्रामपंचायत कार्यालय या ठिकाणी बाहयस्थ पध्दतीने विविध पदांवर कंत्राटी तत्वावर कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या कर्मचाऱ्यांना विविध संस्थामार्फत एकत्रित स्वरुपात मानधन देण्यात येत असून त्यांच्या कामाच्या स्वरुपानुसार त्यांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता प्रदान करण्यासाठी दर निश्चित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय:**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत कंत्राटी तत्वावर कार्यरत कर्मचाऱ्यांना पुढीलप्रमाणे प्रवासभत्ता व दैनिक भत्ता अनुज्ञेय राहील.

| अ. क्र. | कंत्राटी कर्मचाऱ्याचे पद | अनुज्ञेय प्रवास भत्ता | अनुज्ञेय दैनिक भत्ता व मासिक मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | एमआयएस को-ऑर्डिनेटर | पंचायत समिती / तहसिल कार्यालय येथे जाण्याकरिता साधारण बस/ शेअर ऑटोरिक्षा / रेल्वेचे द्वितीय वर्ग प्रवासाकरिता प्रत्यक्ष प्रवास भाडे | रु. १००/- प्रतिदिन (फक्त जिल्ह्यांतर्गत प्रवासाकरिता) व रु. २००/- प्रति दिन (जिल्ह्याबाहेर प्रवासाकरिता) (प्रति महिना रु. १,२००/- पर्यंत) |
| २ | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (संनियंत्रण) (जिल्हा स्तर) | पंचायत समिती/तहसिल कार्यालय येथे जाण्याकरिता साधारण बस/शेअर ऑटोरिक्षा/ रेल्वेचे द्वितीय वर्ग प्रवासाकरिता प्रत्यक्ष प्रवास भाडे | रु. ५०/- प्रति दिन (प्रति महिना रु. ५००/- पर्यंत) |
| ३ | सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (समन्वय) (पंचायत समिती स्तर) | जिल्हा कार्यालय / ग्रामपंचायत येथे जाण्याकरिता साधारण बस/शेअर ऑटोरिक्षा / रेल्वेचे द्वितीय वर्ग प्रवासाकरिता प्रत्यक्ष प्रवास भाडे | रु. ५०/- प्रति दिन (प्रति महिना रु. ५००/- पर्यंत) |
| ४ | तांत्रिक अधिकारी (तालुका / पंचायत समिती स्तर) | जिल्हा कार्यालय / ग्रामपंचायत येथे जाण्याकरिता साधारण बस/शेअर ऑटोरिक्षा / रेल्वेचे द्वितीय वर्ग प्रवासाकरिता प्रत्यक्ष प्रवास भाडे | रु. ५०/- प्रति दिन (प्रति महिना रु. ८००/- पर्यंत) |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | क्लार्क कम डेटा एन्ट्री ऑपरेटर | जिल्हा कार्यालय / पंचायत समिती / तहसिल कार्यालय येथे जाण्याकरिता साधारण बस/शेअर ऑटोरिक्षा / रेल्वेचे द्वितीय वर्ग प्रवासाकरिता प्रत्यक्ष प्रवास भाडे | रु. ५०/- प्रति दिन (प्रति महिना रु. २५०/- पर्यंत) |

२. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (संनियंत्रण), सहाय्यक कार्यक्रम अधिकारी (समन्वय) व तांत्रिक अधिकारी यांच्याकरीता या विभागाच्या दिनांक १६.१२.२०१० रोजीच्या शासन निर्णयामध्ये उल्लेख केलेली प्रवास खर्च व मोबाईल खर्च या करीता रुपये १०००/- इतकी एकत्रित असलेली तरतूद या शासन निर्णयान्वये रद्द करण्यात येत आहे. मात्र मोबाईल फोन खर्चासाठी या अधिका-यांना कमाल रुपये ३००/- प्रती महिना अशी रक्कम अनुज्ञेय करण्यात येत आहे.

३. प्रस्तुत प्रयोजनाकरिता होणारा खर्च, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत उपलब्ध होणाऱ्या निधीपैकी प्रशासकीय खर्चाकरिता अनुज्ञेय असलेल्या ६% निधीतून भागविण्यात यावा.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक संकेतांक 201208221152071900 असा आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,**

वि.गिरीराज

( व्ही. गिरीराज )
प्रधान सचिव (रोहयो)

प्रत,
सर्व विभागीय आयुक्त.
सर्व जिल्हाधिकारी .(मुंबई शहर व मुंबई उपनगर जिल्हा वगळून).
आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना, महाराष्ट्र, नागपूर.
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी.जिल्हा परिषद ,
सर्व उपायुक्त (मग्रारोहयो)
सर्व उपजिल्हाधिकारी (मग्रारोहयो)
प्रधान महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र ,२ व १ मुंबई व नागपूर.
प्रधान महालेखापाल ,( लेखा परीक्षा) महाराष्ट्र ,२ व १ — मुंबई व नागपूर.
संचालक.मुंबई ,महाराष्ट्र राज्य ,लेखा व कोषागारे ,
सर्व सहसंचालक.लेखा व कोषागारे ,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी/सहाय्यक संचालक (लेखा)/लेखा अधिकारी / संशोधन अधिकारी, नियोजन विभाग (मग्रारोहयो)
कार्यासन मग्रारोहयो-१ (सारग्रंथासाठी)
निवड नस्ती, मग्रारो-३